आधुनिक विचारांचे
# वर्तमान

बीड । मंगळवार, २७ जुलै २०२१ । वर्ष : ३
आपले वृत्तपत्र, आपला आवाज
अंक : ४० । पाने : ४ । मूल्य २ ₹

समर्थ वारसा,
सक्षम नेतृत्व
वाचा : संघर्षकन्या



# शुभम धूत यांचे कार्य थेट लंडनच्या वर्ल्ड बुक ऑफ रेकॉर्डमध्ये

प्रतिनिधी

बीड : सामाजिक क्षेत्रात अग्रेसर असलेले बीडच्या राजयोग फाऊंडेशनचे अध्यक्ष तथा शिवसेना नगरसेवक शुभम दिलीप धूत यांच्या कार्याची दखल थेट लंडनच्या वर्ल्ड बुक ऑफ रेकॉर्डने घेतली असून त्यांना सर्टीफिकेट ऑफ ऑफ कमिटमेंट या पुरस्काराने गौरविण्यात आले आहे.

कोरोनाच्या भीतीने रस्ते निर्मनुष्य असतांना, कोरोनाची भीती झुगारून तो तरूण रस्त्यावर उतरला, मदतीचा हात देत राहिला, हजारो कुटूंबाच्या चुली पेटवल्या, अनाथांना आधार देत माणुसकीचा धर्म पाळत राहीला, भुकेलेल्याना अन्न दिले, बंद चूली पेटवण्यासाठी जीवनावश्यक साहित्य दिले, रुग्णालयात उपचारासाठी खिशात दमडी नव्हती त्याचे बीले भरले, तर गरज असलेल्याना रक्त दिले, काम सोपे नव्हते मात्र त्या तरूणाच्या आधारामुळे हजारो कुटूंबाचे जगणे सोपे झाले याच कामाची पावती मिळाली, या अनन्य साधारण कामगिरीमुळे बीडचे शिवसेना नगरसेवक व राजयोग फाऊंडेशनचे अध्यक्ष शुभम दिलीप धुत यांना वर्ल्ड बुक ऑफ रेकॉर्ड, लंडनने सर्टिफिकेट ऑफ कमिटमेंट या पुरस्काराने सन्मानित केले.

कोरोनाच्या महामारीत कोरोनाच्या पहिल्या अन दुसऱ्या लाटेत जनसामान्यांसाठी केलेल्या कामगिरीसाठी सर्वात कमी वयात पुरस्कार मिळवणारा तरुण म्हणून ही शुभम चा गौरव करण्यात



आला. शुक्रवार, दि.२३ जुलै रोजी वर्ल्ड बुक ऑफ रेकॉर्डचे महाराष्ट्र उपाध्यक्ष महेबूब सय्यद, वर्ड बुक ऑफ रेकॉर्ड होल्डर आदम सय्यद, मराठी चित्रपट निर्माते सिकंदर सय्यद, रूमा सय्यद यांच्या हस्ते हा सन्मान पुण्यातील हॉटेल हयात येथे नगरसेवक शुभम धुत यांना प्रदान करण्यात आला.

कोरोनाच्या पहिल्या लाटेत अचानक लॉकडाऊन झाले, कोरोनाच्या भीतीने माणसातील माणुसकी सुद्धा भयभीत झाली होती, मदतीला कोणी यायला तयार नव्हते, हातातील काम गेले होते, उद्या काय खावे याची चिंता होती, अनाथला आधार नव्हता, अशा संकट काळात कोरोनाची भीती झुगारून शुभम धुत रस्त्यावर उतरला होता, सकाळ पासून संध्याकाळ पर्यत मदतीचा यज्ञ सुरू होता, वार्डा-वॉर्डात जाऊन मदतीचे वाटप सुरू होते, मंदिर-मस्जिद, चर्च, सर्व आश्रमापासून स्मशानभूमीत वास्तव्य करणाऱ्या, चर्च व कब्रस्तानची देखभाल करणाऱ्या नागरिकापर्यंत किराणा सामानाच्या किट पोहोच केल्या शहरातील हजारो नागरिकांना मदत पोहोचवून वाडी-वस्तीसह जिल्ह्यातील ग्रामीण भागात जाऊन आवश्यक मदतीचा ओघ पोहोचवत होता, अशा संकटकाळात बीड शहरासह ग्रामीण भागात सतत ५० दिवस राजयोग फाऊंडेशनच्या माध्यमातून स्वत: अन्नधान्य व किराणा साहित्य वाटप, कोरोनाच्या दुसऱ्या लाटेत ही सर्व सामान्य नागरिकांना कोरोना वॉर्डात जाऊन आरोग्य सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी सतत प्रयत्नशील राहण्याबरोबरच, या २ दोन वर्षात राज्यात सर्वत्र रक्ताचा तुटवडा असताना अत्यावश्यक रूग्णांना ३ वेळा स्वत: ओ निगेटिव्ह रक्त दिले, त्याचबरोबर गरजू कुटुंबांना दिवाळी व ईद साजरी करण्यासाठी आवश्यक साहित्य वाटप केल्याबद्दल त्यांचा वर्ल्ड बुक ऑफ रेकॉर्ड, लंडनच्या वतीने गौरव करण्यात आला.

बातमी व जाहिरातीसाठी संपर्क
9423209823
मुख्यालय : 'शिवगड' २३, मुख्य रस्ता, मस्जिद चौक, माजलगाव जि.बीड

## फास्टट्रॅकन्यूज

### डॉ.वसिम मनसबदार यांच्यावरील ॲट्रोसिटी गुन्हा मागे घ्या : खान



माजलगाव : पंचायत समितीचे उपसभापती डॉ.वसिम मनसबदार यांच्यावर झालेल्या विद्युत कर्मचाऱ्याने दाखल कलेला ॲट्रोसिटी गुन्हा हेतूने प्रेरित असून तो त्वरित मागे घ्यावा, अशी मागणी संघर्ष प्रतिष्ठाणचे आरेफ खैरूल्ला खान आणि डॉ.अरबाज काझी यांनी केले आहे. डॉ.वसिम मनसबदार यांची प्रतिमा मलिन करण्याचाच हा प्रकार असून पात्रुड येथे एका विद्युत कर्मचाऱ्याने हेतू प्रेरित ॲट्रोसिटी गुन्हा दाखल केलेला आहे. तो तात्काळ मागे घ्यावा, अशी मागणी प्रसिध्दी पत्रकाव्दारे करण्यात आली आहे.

वर्तमान प्रतिबिंब
रहा ऑनलाईन कनेक्ट..
www.vartmannews.in
या वेबसाईटला भेट द्या !

# लसिकरणात महाराष्ट्राची 'आघाडी'

## दोन्ही डोस घेणाऱ्यांची संख्या कोटीवर

प्रतिनिधी

मुंबई : राज्य सध्या भूस्खलन, महापूर अशा नैसर्गिक आपत्तींशी झगडत आहे. काहींनी यात जीव गमावला, तर काहींनी जीवापाड प्रेम असलेली माणसे, राज्यात दुःखाचे, काळजीचे वातावरण असले तरी त्यात आता एक दिलासा देणारी बातमी समोर येत आहे. राज्यात कोरोना प्रतिबंधक लसीचे दोन्ही डोस घेतलेल्या नागरिकांची संख्या आता एक कोटींहूनही अधिक झाली आहे. अशा प्रकारचा विक्रम करणारे देशात महाराष्ट्र हे पहिले आणि एकमेव राज्य ठरले आहे.

कोरोना विरुद्धच्या लढाईत महाराष्ट्रात एक कोटीहून अधिक नागरिकांना लसीचे दोन्ही डोस देऊन त्यांना संपूर्ण संरक्षण देण्यात आले. असून संपूर्ण देशात एक कोटीहून अधिक नागरिकांना लसीचे दोन्ही डोस देण्याचा विक्रम महाराष्ट्राने सोमवारी स्वत:च्या नावावर नोंदविला. दोन्ही डोस देऊन एक कोटीहून अधिक नागरिकांचे कोरोनापासून संरक्षण करण्याकामी आरोग्य विभागाने केलेल्या प्रयत्नांची मुख्यमंत्री उद्धव ठाकरे, आरोग्यमंत्री राजेश टोपे यांनी कौतुक केले आहे. तसेच पर्यावरण मंत्री आदित्य ठाकरे यांनीही ट्विट करत नागरिकांचे आणि प्रशासनाचे अभिनंदन केले आहे.सोमवारी सायंकाळी चार वाजेपर्यंत राज्यात दिवसभरात सुमारे पावणेचार लाख नागरिकांचे लसीकरण करण्यात आले असून दोन्ही डोस देण्यात आलेल्या नागरिकांची संख्या एक कोटी ६४ हजार ३०८ एवढी झाली आहे.

लसीकरणामध्ये नवनवीन विक्रम महाराष्ट्राच्या नावावर नोंदविले जात आहे. आतापर्यंत राज्यातील तीन कोटी १६ लाख ९ हजार २२७ नागरिकांना



लसीचा पहिला डोस देण्यात आला आहे, तर सुरू असलेल्या लसीकरणामुळे दोन्ही डोस घेतलेल्या नागरिकांच्या संख्येचा एक कोटीचा टप्पा पार झाला, असे आरोग्य विभागाचे अपर मुख्य सचिव डॉ.प्रदीप व्यास यांनी सांगितले.

## समता परिषद धावली पूरग्रस्तांच्या मदतीला

प्रतिनिधी

बीड : जिल्हा अखिल भारतीय महात्मा फुले समता परिषद पूरग्रस्त भागातील नागरिकांना मदत करण्यासाठी पुन्हा धावली आहे. त्यांनी अन्न आणि पाणी घेऊन समता परिषदेचे सैनिक रायगड जिल्ह्यातील महाड आणि रत्नागिरी जिल्ह्यातील चिपळूण तालुक्यातील अतिवृष्टीबाधित पूरग्रस्त बांधवांच्या मदतीसाठी रवाना झाले आहेत समता परिषदेच्या वतीने सैनिक ५,००० चिवड्याचे पॅकेट्स, ३०० बिसलरी पाण्याची बॉक्स, ५,००० बिस्कीट पुडे बॉक्स यासह जीवनावश्यक वस्तू घेऊन रविवारी सायंकाळी रायगड जिल्ह्यातील महाड आणि चिपळूण तालुक्यातील अतिवृष्टी बाधित पूरग्रस्तांच्या मदतीसाठी रवाना झाले आहेत.

## लाचखोर फौजदार एसीबीच्या जाळ्यात

प्रतिनिधी

बीड : अटकपूर्व जामिनासाठी सहकार्य करण्यासाठी एक लाख रूपयांच्या लाचेची मागणी करून तडजोडअंती ८० हजार घेण्याचे मान्य केले. या प्रकरणी फौजदारावर औरंगाबाद एसीबीने सोमवारी कारवाई केली. अंभोरा ठाण्यातील पोलीस उपनिरीक्षक राहुल पांडुरंग लोखंडे यांच्यावर कारवाई करण्यात आली. राहुल लोखंडे यांनी यातील तक्रारदार यांचेविरूध्द अंभोरा येथे दाखल असलेल्या गुन्ह्यात त्यांना मंजूर असलेला अटकपूर्व जामीन मा.हायकोर्टाकडून रद्द न करण्यासाठी एक लाख रूपये लाचेची मागणी केली होती.



### महामहिम राजेंद्र आर्लेकरांचा गौरव

सिमला : हिमाचल प्रदेशचे राज्यपाल राजेंद्र आर्लेकर यांचा पारंपरिक टोपी परिधान करून गौरव करताना केंद्रीय माहिती व प्रसारण मंत्री अनुराग ठाकूर.






संपादकीय

# निर्बंधामुळे उद्योगाचे मोडले कंबरडे

गेली दीड वर्ष जग आणि देश कोरोनाशी समर्थपणे लढा देत आहे. कोरोनाच्या निर्बंधामुळे देशाची आर्थिक घडी बसवताना तारेवरची कसरत करावी लागत आहे. कोविड-१९ नावाच्या विषाणूने संपूर्ण जगाला कवेत घेतले. दीड वर्षाहून अधिक काळ नागरिक रोजच्या व्यवहारात गोंधळलेले आणि धास्तावलेले आहेत. आता तिसऱ्या लाटेचा कहर अनेक देशांमध्ये सुरू झाला आहे. या पार्श्वभूमीवर महाराष्ट्रातील सर्व जिल्हाधिकाऱ्यांनी उद्योजकांशी चर्चा करून परिपूर्ण आराखडा तयार करून उद्योग-धंदे सुरू ठेवण्याचे निर्देश सरकारने दिले आहेत. उद्योजकांना कर्मचाऱ्यांसाठी कामाच्या ठिकाणी राहण्याची सोय तसेच वाहतूक करण्याच्या सूचना दिल्या आहेत. पण सर्वानाच कामाच्या ठिकाणी राहणे शक्य होणार आहे का? हाच प्रश्न यानिमित्ताने निर्माण झाला आहे, तर दुसरीकडे, मुंबईकरांची जीवनवाहिनी असलेली लोकल सुरू करण्यास सरकार तयार नाही. निर्बंध घालून देखील नागरिक लोकलने विनातिकीट प्रवास करत आहेत. आता लोकल खचाखच भरलेल्या असतात. कारण लोकांना काम-धंदा हवा आहे. पैसा कमावला नाही, तर घर कसे चालेल? मुलाबाळांची पोटं कशी भरणार? त्यासाठी लोकं आता जीवाची पर्वा न करता काम-धंद्यासाठी बाहेर पडत आहेत. दीड वर्षाहून अधिक काळ निर्बंधात जगलो, आता ते शक्य नाही! या निर्बंधामुळे उद्योग-धंदे भुईसपाट झाले आहेत. ते सावरणार कसे? उद्योग-धंद्याना आकारला जाणारा टॅक्स, भाडे, कर्जाचे हप्ते फेडणार कसे? कोरोनामुक्तीच्या दिशेने जाताना लादलेले प्रतिबंधात्मक नियम म्हणजे आजारापेक्षा उपाय भयंकर' असेच आहेत. यावर आता जनता आवाज उठवू लागली आहे. कोल्हापूरला १०० दिवसांनंतर दुकाने उघडण्याची परवानगी मिळाली. त्यासाठी व्यापाऱ्यांना आंदोलन करावे लागले. आमची आर्थिक घडी विस्कटली आहे, हे टाहो फोडून सरकारला सांगावे लागते आहे. उद्योग-धंदे डबघाईला आले असून उद्योजक आत्महत्या करत आहेत. काही दिवसांपूर्वी विरार येथे करुणाकर बी. पुत्रण या हॉटेल व्यावसायिकाने कर्जबाजारी झाल्याने आत्महत्या केली. त्याचे हॉटेलचे भाडे थकले होते. लाइटबिल भरू शकत नव्हते. देणेकऱ्यांनी तगादा लावला होता. शेवटी त्याने आत्महत्या केली. सुसाईड नोटमुळे याचा उलगडा झाला. अशा किती उद्योजकांनी आत्महत्या केल्यावर सरकारला जाग येणार आहे? ही परिस्थिती केवळ महाराष्ट्रापुरती मर्यादित नाही, तर देशात आणि जगात कमी अधिक फरकाने हेच घडत आहे. विकसित देशांना सेवा पुरवणाऱ्या आयटी कंपन्यांची जागतिक पातळीवरची देवघेव इतकी वाढली आहे की, एका देशातील उद्योग बंद पडताच दुसऱ्या देशाला त्याचा लगेच फटका बसतो. चीनमधून भारतात येणाऱ्या गाड्यांचे सुटे भाग व औषधांसाठी लागणारा कच्चा माल उपलब्ध होत नसल्याने त्याचा औषध व वाहन उद्योगांवर विपरीत परिणाम झाला आहे. देशातील पर्यटन व वाहतूक क्षेत्र मंदीच्या सावटाखाली आहे. तीर्थक्षेत्रे, खाण्याच्या जागा, शॉपिंग मॉल तसेच गर्दीच्या जागा ओस पडल्या आहेत. कृषी क्षेत्रालाही मोठा फटका बसला आहे. जागतिक अर्थव्यवस्थेत औषध कंपन्या वगळता अनेक उद्योगांना घरघर लागली आहे. असंघटित क्षेत्राला याचा मोठा तडाखा बसला आहे. अगदी रिक्षावाला, हातगाडीवाला, टॅक्सीवाले, रस्त्यावरचे खेळणी विक्रेते, चहावाले यापासून तर वेटर, गॅरेजवाले, मॉलमधील तरुण-तरुणी, कागद-काच-भंगार-जमा करणारे, बांधकाम क्षेत्रात काम करणारे मजूर, अर्धकुशल, अकुशल कामगार अशा हातावर पोट असलेल्या लोकांच्या रोजगारावर कोरोनामुळे आणि निर्बंधामुळे संक्रांत आली आहे. हॉटेलप्रमाणे चहा, वडापाव, समोसे, पाणी पुरी, मिठाईवाले निर्बंधाच्या दुष्टचक्रात अडकले आहेत. अनेकांनी बँकांकडून कर्ज घेतले आहे, ते फेडणार कसे? यावर सरकारने थोडा विचार करावा, असे सामान्य जनतेला वाटते. कोरोनाचा वाहतूक क्षेत्रावरही परिणाम झाला आहे. मल्टिप्लेक्स बंद आहेत. त्यामुळे या व्यवसायावर अवलंबून असलेले तसेच नाट्यक्षेत्रातील कलाकार आणि पडद्यामागे काम करणारे कामगार यांच्या उत्पन्नावरही गदा आली आहे. उद्योगावर काय परिणाम होईल आणि त्यासाठी काय उपाययोजना कराव्या लागतील, याचाही विचार सरकारला करावाच लागणार आहे. तसेच केंद्र व राज्य सरकारने पुढाकार घेऊन करसवलती व अन्य शक्य त्या उपाययोजना त्वरेने करणे आवश्यक आहे. अर्थतज्ज्ञांची समिती नेमून उद्योगांवर होणाऱ्या परिणामांचा अभ्यास करून वेळीच योग्य ती पावलेही उचलणे गरजेचे आहे. वाढती वित्तीय तूट आणि वाढती महागाई या दुहेरी संकटातून देशाला बाहेर काढले पाहिजे. केंद्र सरकारने कोणत्या क्षेत्रात अधिकाधिक रोजगारांची निर्मिती होऊ शकते, यावर लक्ष केंद्रित करायला हवे. बँकिंग क्षेत्राने पतपुरवठ्यातील गुंतागुंत कमी करून ही प्रक्रिया सहजसोपी करायला हवी. कृषी क्षेत्रानंतर सर्वाधिक रोजगार पुरवणारे एमएसएमई हे दुसऱ्या क्रमांकाचे क्षेत्र असून कोरोनामुळे प्रभावीत झाले आहे. त्यामुळे या क्षेत्राला देखील पतपुरवठा मोठ्या प्रमाणात केला पाहिजे. टाळेबंदीच्या काळात गावाकडे परतलेल्या स्थलांतरित मजुरांमुळे ग्रामीण अर्थव्यवस्थेवर देखील ताण आला आहे. मालाचे उत्पादन, पुरवठा, वितरणाची साखळीच पूर्णपणे विस्कळीत झाली आहे. अत्यावश्यक सेवा वगळता, सर्वच कामे ठप्प झाली आहेत. तयार माल आणि उपकरणांच्या किंवा वाहनांच्या सुट्या भागांची निर्मिती करणाऱ्या उद्योगांचा यात समावेश आहे. सुट्याभागांचा पुरवठा खंडीत झाल्यास आंतरराष्ट्रीय कराराचा भंग होऊ शकतो. त्यात आंतरराष्ट्रीय बाजारात कंपन्या काळ्या यादीत टाकण्याची भीती उद्योजकांना आहे. अशीच परिस्थिती दीर्घकाळ राहिली तर, याचे गंभीर परिणाम होऊन अर्थव्यवस्थेला पुन्हा उभारी घेण्यासाठी अधिक काळ लागू शकतो. जगात मंदीचा काळ सुरू असतानाच हे कोरोनाचे संकट अचानकपणे आले. त्यामुळे जगातील अनेक विकसित आणि विकसनशील देशांचे ट्रिलियन डॉलरने नुकसान झाले आहे. तर भारताच्या अर्थव्यवस्थेची अपरिमित हानी झाली आहे. याची आकडेवारी सरकारने प्रसिद्ध केली, तर हे सत्य जनतेला देखील समजेल. प्रदीर्घ कालावधीतील लॉकडाऊन अर्थव्यवस्थेला कमकुवत बनवू शकते. बँकांच्या भविष्यात संपत्तीत कमतरता येऊ शकते. कदाचित एनपीए' म्हणजे अनुत्पादक कर्जात पुन्हा वाढ होऊ शकते. उद्ध्वस्त झालेल्या अर्थव्यवस्थेला नवसंजीवनी देण्यासाठी सरकारने एकमेकांकडे बोट दाखवण्यापेक्षा कंबर कसली पाहिजे. सरकारच्या प्रयत्नांना जनतेनेही साथ द्यावी, ही काळाची गरज आहे.

# पूरस्थिती आणि दरडींना जबाबदार कोण?

**गेल्या पाच ते सहा दिवसांपासून संपूर्ण महाराष्ट्रात मुसळधार पावसाची मालिका सुरू आहे. सततच्या पावसाने नद्यांना पूर आलेत, कुठे घरे कोसळतायत, कुठे दरड पडतेय तर कुठे जमीन खचतेय. निसर्गानं अचानक असा तांडव का सुरू केलाय? त्यामागचे नेमके कारण काय? याबद्दलचा एक वीडियो पर्यावरणतज्ञ आणि पत्रकार अभिजित घोरपडे यांनी त्यांच्या 'भवताल' या युट्यूब चॅनेलवर टाकलाय. या वीडियोचे हे शब्दांकन.**

आज-काल

विशेष प्रतिनिधी

सगळीकडे पाऊस पडतोय. ठिकठिकाणी दरड कोसळतेय. पूर आलेत. याचा नेमका अर्थ काय? हे सगळे कशामुळे घडतेय? पावसामुळे का माणसामुळे? याच्याबद्दल अनेकांशी बोलतोय. लोकं त्यांच्या त्यांच्या परीने कारणे सांगतायत. अर्थातच, त्यांच्या अनुभवानुसार. पण पुण्यात एक शहाणा भेटला. म्हणाला, पावसाने जाम वैताग आणलाय. तिकडे शेतावर, धरणावर पडावे ना इथे आमच्या शहरामधे रस्त्यावर तुझं काय काम आहे? आता काय बोलणार? पुण्यात भेटला म्हणून आता त्याला पुणेरी शहाणा' म्हणतो. पण असे नग जागोजागी भेटतात. पण या निमित्ताने आपण पावसाबद्दल आणि पुराच्या परिस्थितीबद्दल बोलुयात.





**दुसऱ्या क्रमांकाचा पाऊस**

खरंतर महाराष्ट्रात विशेषतः कोकण घाटात आणि दक्षिण महाराष्ट्रात प्रचंड पाऊस कोसळतोय. २४ तासांत धरणाच्या क्षेत्रात इतका पाऊस पडलाय की कोल्हापूरमधलं राधानगरी धरण, सांगलीतलं वारणा, साताऱ्यातलं कोयना या तिनही धरणांच्या क्षेत्रात २४ तासांत ६२४ मिलीमीटरच्या आसपास पाऊस झालाय. इकडे पुणे जिल्हा आणि रायगड जिल्हा यांच्या सीमेवरचा तामिणी घाट. तिथेही जवळजवळ ५०० ते ५२५ मिलीमीटर पाऊस पडलाय. कोल्हापूर जिल्ह्यातच राधानगरी जवळ तुळशी धरणांच्या क्षेत्रात तर तब्बल ८९५ मिलीमीटर पाऊस पडला, असं जलसंपदा विभागानं जाहीर केलंय. ८९५ मिलीमीटर म्हणजे ३५ इंच पाऊस फक्त २४ तासात! हे खरे असेल तर महाराष्ट्रातला हा दुसऱ्या क्रमांकाचा पाऊस असेल. मुंबईत २६ जुलै २००५ ला ९४१ मिलीमीटरच्या पावसानंतर हाच. इतका पाऊस पडत असेल तर का पूर येणारच आणि दरडी कोसळणारच की! पण यामागे फक्त पाऊस पडणं इतका मोठा पाऊस पडणं हे एकमेव कारण आहे का? मला वाटतं आपण याच्या पलीकडे बघायला पाहिजे. खरे सांगा, नदीच्या पात्रांमधे आपण जर अतिक्रमणं केलीयत, हो की नाही? ओढे-नाले बुजवलेत, डोंगरांवर रस्त्याच्या निमित्ताने डोंगर फोडलेत, कसेही सुरुंग लावलेत. तर या घटना घडणार नाहीत का? त्यामुळे पावसाकडे बोट दाखवण्यापूर्वी आपण काय करतोय याच्याकडे पाहायला हवे.

**हव्यासापोटी जिओलॉजी धोक्यात**

सुरवातीला आपण नद्यांबद्दल बोलुयात. नदी फक्त वाहणारा पाण्याचा प्रवाह नसतो. तिला अनेक ओढे, नाले येऊन मिळतात. त्यातून निर्माण होणारी व्यवस्था असते. आपण काय केले आहे? आपण ही व्यवस्थाच कोलमडून टाकली. म्हणजे आपण ओढे, नाले बुझवले. आपण नदीच्या पात्रात शिरलो. नदीचे एक गाळाचे मैदान असते. पूर येतो तेव्हा नदी दोन्ही बाजूनी पसरते. लांबपर्यंत पसरते. आपण तिच्या गाळाच्या मैदानात जाऊन तिथेच तिथेच घर बांधली, बांधकाम केले आणि नंतर ओरडायला लागलो की आमच्या घरात नदी शिरली. तर हे कसे चालेल? डोंगराबद्दल, प्लॉट पाडण्याच्या आणि रस्ते पाडण्याच्या नावाखाली आपण कसेही डोंगर फोडले, टेकड्या फोडल्या. सगळे सपाट करण्याच्या नादात कसेही सुरूंग लावले. त्याच्यामागची जिओलॉजी लक्षात घेतली नाही. तिथली भूरचना कसली हे बघितले नाही आणि वाटेल तसे डोंगर फोडत सुटलो. तर नंतर दरडी कोसळल्या, माती खाली आली आणि आमचे नुकसान झाले यासाठी आपण त्या डोंगराला आणि पावसाला जबाबदार धरणार का?

**थांबेल का हवामान बदल?**

आता पावसाबद्दल पण बोलुयात. नेहमीपेक्षा जास्त पाऊस पडलाय का? तर हो. पण असा जास्त पाऊस या आधी झाला नाही का? समजा नसेल झाला तर आपण काय करणार? आपण पाऊस थांबवू शकतो का? ते आपल्या हातात आहे का? अजिबात नाही. त्यामुळे जे काही होतंय त्याला सामोरे जायला हवे. बदलत्या परिस्थितीत हे सगळे वातावरण बदलेल तेव्हाही तापमानात वाढ होईल, हवामान बदलेल. अतिवृष्टी, ढगफुटी, कमी वेळात जास्त पाऊस पडण्याच्या घटना असतीलच. त्या वारंवार घडतील. त्यांची तीव्रताही वाढणार आहे. हे सगळे आपण थोपवू शकत नाही. हवामान बदल आपण थांबवायचे ठरवले तरी फारसा उपयोग नाही. जगाने एकत्रित प्रयत्न केले तरीही ही गोष्ट पुढच्या वीस पंचवीस वर्षात थांबणारी नाही. संपूर्ण जगाने आज ठरवले की, आम्ही जास्त कार्बन उत्सर्जन करणार नाही. तरीही हे सगळे थांबवण्यासाठी आपल्याला ६० ते १०० वर्ष लागतील.

**आपल्या हातात काय आहे?**

या होणाऱ्या बदलांना सामोरे जाणे आणि आपल्याकडून होणाऱ्या चुका कमी करणे एवढेच आपल्या हातात आहे. हे केले तर याची तीव्रता आपण कमी करू. आपले नुकसानही त्यामुळे कमी होऊ शकेल. यासाठी आपल्याला खरे शहाणपण घ्यावे लागेल. नुसतेच पावसाने कुठे पडावे, किती पडावे, कसे पडावे याच्याबद्दल त्याला सल्ले देण्यापेक्षा किंवा अतिशहानपणाने बोलण्यापेक्षा पावसाशी जुळवून घेतले, बदलत्या परिस्थितीत योग्य वागलो तर आपले होणारे नुकसान आपण नक्कीच कमी करू शकू. सध्या आपण याकडे लक्ष दिले पाहिजे. तिसरीकडे लक्ष नेऊन आता जे घडतेय ते हवामान बदलांमुळे होतेय तसेच पाऊस जास्त पडलाय इकडे जास्त लक्ष न देता आपण याला कसे सामोरे जाऊ शकू याकडे भर दिला तर आपण निश्चितपणे नुकसान कमी करू. आताच्या घडीला हेच गरजेचे आहे.

# विश्वव्यापी दुःख कॅमेराबंद करणारा दानिश

**रॉयटरचे मुख्य फोटोग्राफर पत्रकार दानिश सिद्दीकी अफगाणिस्तानमधे फिल्डवर असताना तालिबान्यांच्या हल्लयात शहीद झाले. कोरोना आणि लॉकडाऊनच्या काळात त्यांनी कॅमेरात जे टिपले ते प्रचंड अस्वस्थ करणारे होते. रोहिंग्या शरणार्थींचं दुःख दानिश यांच्या फोटोंनी जगभरात नेले. त्यासाठी त्यांना प्रतिष्ठेचा पुलित्झर पुरस्कार मिळाला. तो मिळवणारे ते पहिले भारतीय ठरले.**

विशेष

अक्षय शारदा शरद

दानिश सिद्दीकी. फोटोग्राफर आणि रॉयटरच्या भारतातल्या 'रॉयटर पिक्चर मल्टीमीडिया टीम'चे प्रमुख. जगभरातल्या व्यथा, वेदनांना त्यांनी निर्भयपणे आपल्या कॅमेरात टिपले. ते जगभर पोचले. दिल्लीतली हिंसा, लॉकडाऊन, कोरोनाचे संकट अशा प्रत्येक वेळी जे भयाण वास्तव त्यांच्या फोटोंनी टिपले ते अस्वस्थ करणारे होते. अफगाणिस्तानमधे तालिबान्यांच्या हल्लयात दानिश शहीद झाले. या बातमीने जग हळहळले. एकाच वेळी राग, चीड, संताप सगळे काही व्यक्त झाले.



**पुलित्झर मिळवणारे एकमेव भारतीय**

दक्षिण दिल्लीतल्या फादर अग्नेल शाळेतून दानिश यांचे सुरवातीचे शिक्षण झाले. पुढे दिल्लीच्या जामिया मिलिया इस्लामियातून त्यांनी अर्थशास्त्र विषयात पदवी घेतली. २००७ ला जामियाच्या एजेके मास कम्युनिकेशन रिसर्च सेंटरमधून मास कम्युनिकेशनमधे मास्टर्स केले. त्यानंतर हिंदुस्थान टाइम्समधून रिपोर्टर म्हणून त्यांच्या करियरला सुरवात केली. २००८ ते २०१० दरम्यान दानिश यांनी इंडिया टुडेत काम केले. २०१० ला ते रॉयटर या जगप्रसिद्ध न्यूज एजन्सीशी जोडले गेले. तिथे इंटर्न म्हणून काम सुरू झाले. २०१६-१७ मधे इराक मधले दुसरे मोठे शहर असलेल्या मोसुल इस्लामिक स्टेटने ताब्यात घेतले होते. ही मोसुलची लढाई फोटो जर्नालिस्ट म्हणून तिथे जाऊन कवर करायची संधी दानिशना मिळाली. अफगाणिस्तान आणि इराक युद्ध, २०१५ ला नेपाळमधला भूकंप, रोहिंग्या शरणार्थींचा मुद्दा, २०१९ - २० चं हॉंगकॉंग लोकशाही आंदोलन अशा अनेक गोष्टी त्यांनी प्रत्यक्ष फिल्डवर जाऊन कवर केल्या. तसंच दक्षिण आशिया, मध्य पूर्व आणि युरोपमधल्या इतर अनेक बातम्या कवर केल्या होत्या. रोहिंग्या शरणार्थींच्या मुद्यासाठी म्हणून त्यांना सहकारी अदनान अबीदी यांच्यासोबत फिचर फोटोग्राफीसाठी २०१८ ला पुलित्झर मिळाला. हा पुरस्कार मिळवणारे ते पहिले भारतीय होते.

**अस्वस्थ करणारी फोटोग्राफी**

दानिश यांची फोटोग्राफी हेच त्यांचे काम होते. तेच बोलायचे. हे फोटो सोशल मीडियातून वायरल झाले. त्यांनी अस्वस्थ केले. विधायक चर्चा घडवून आणली. तसा सरकारला जाबही विचारला गेला. मागच्या वर्षी दिल्लीच्या जामिया मिलिया इस्लामिया सीएएविरोधात आंदोलन चालले होते. तिथे गोपाळ शर्मा नावाच्या एका अल्पवयीन मुलाने आंदोलकर्त्यावर बंदूक रोखली होती. दिल्ली दंगलीवेळी त्यांनी काढलेले फोटोही वायरल झाले होते. रोहिंग्या शरणार्थींचा मुद्दा दानिश यांनी आपल्या फोटोंमधून जगभर पोचवला. ११ सप्टेंबर २017 ला बांगलादेश-म्यानमार सीमा पार केल्यावर एक महिला समुद्राच्या किनाऱ्याला स्पर्श करत असल्याचा एक फोटो. पुलित्झर मिळवून दिला त्यापैकी तो एक. शरणार्थींचे हे दुःख जगाच्या वेशीवर पोचवणारे होते. कोरोनाचं संकट आणि लॉकडाऊनच्या काळात भारतातले न्यूज चॅनेल जे दाखवत होते त्यापलीकडे ते कितीतरी भयावह होते. मजुरी करणारे लाखो लोक मजल दरमजल करत आपापल्या गावी पोचले. तेही हजारो किलोमीटरचे अंतर पार करत. कुणाच्या डोक्यावर ओझे. कुणाच्या खांद्यावर आपले लहान मूल. असाच एका मजुराने आपल्या मुलाला खांद्यावर घेतलेला दानिश यांचा फोटो खूप वायरल झाला होता. कोरोनामुळे झालेल्या मृत्यूनंतर स्मशानात जागा नसणे, त्यामुळे दिल्लीतल्या स्मशानभूमीत दाटीवाटीने जळणाऱ्या चिता, एकाचवेळी एका बेडवर ऑक्सिजन लावलेले दोन पेशंट, शेतकरी आंदोलना दरम्यान काढलेले असंख्य फोटो हे जितके अस्वस्थ करणारे तितकेच आपल्या फसव्या धोरणांचे आणि जुमलेबाजीचं दर्शन घडवणारे. कोल्हापूरातल्या कुस्ती आखड्यांचे त्यांनी काढलेले फोटोही चर्चेत राहिले. दानिश आज आपल्यात नाहीत पण हे फोटो त्यांना कायम जिवंत ठेवतील.

**मृत्यूही स्टोरी कवर करताना**

अमेरिकेने अफगाणिस्तानमधून आपले सैन्य माघारी घेतल्यावर तिथे तालिबान अधिक ऍक्टिव झालेय. तालिबानने अफगानच्या उत्तर, दक्षिणेतले अनेक भाग आपल्या ताब्यात घेतलेत. सरकारी कार्यालये उध्वस्त केली जातायत. त्याला अफगाणिस्तानच्या विशेष सुरक्षा दलाकडून प्रतिकार केला जातोय. त्यांच्यासोबत फोटो जर्नालिस्ट म्हणून दानिश हा सगळा संघर्ष कवर करत होते. दानिश यांनी आपल्या ट्विटरवरून अफगानमधल्या हल्लयांचे अनेक फोटो, वीडियो शेयर केले होते.

१३ जुलैला ते ज्या गाडीतून जात होते त्याला खेटून एक रॉकेट गेले होते. तालिबान्यांनी अधिकाऱ्यांना लक्ष्य केले. या हल्लयातून दानिश बचावले. पण रॉकेटला त्यांनी आपल्या कॅमेरात टिपले होते. तो वीडियोही त्यांनी शेयर केला होता. कंदहारमधल्या स्पिन बुलडाक भागातले मुख्य मार्केट तालिबान्यांनी ताब्यात घेतल्यावर १६ जुलैला अफगान सैन्य आणि तालिबान यांच्यात चकमक झाली. दानिश हे त्यावेळी तिथल्या दुकानदारांशी बोलत असल्याचं एका अफगानी कमांडरने रॉयटरला दिलेल्या प्रतिक्रियेत म्हटले आहे. त्यावेळी झालेल्या चकमकीत वरिष्ठ अफगान अधिकाऱ्यासोबत दानिश यांचा मृत्यू झाला.



# रांगड्या कर्तृत्वाचा सन्मान

माजी मुख्यमंत्री आणि भाजपचे राज्यसभेतील खासदार नारायण राणे यांचा केंद्रीय मंत्रिमंडळात समावेश करून पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी त्यांच्या कार्यकर्तृत्वाचा मोठा सन्मान केला आहे.

व्यक्तीविशेष

सुकृत खांडेकर

राणे आणि त्यांच्या कुटुंबीयांनी भाजपची ताकद महाराष्ट्रात वाढावी म्हणून पक्ष संघटनेला अक्षरशः वाहून घेतले आहे. माजी खासदार व प्रदेश भाजपचे सचिव निलेश राणे आणि आमदार नितेश राणे यांनी सिंधुदुर्ग व रत्नागिरीमध्ये भाजपची ताकद वाढविण्यासाठी सर्वस्व पणाला लावले आहे. पक्षातील जुने जाणते नेते आणि कार्यकर्ते यांना बरोबर घेऊन राणे कुटुंबीय भाजपच्या विस्तारासाठी अहोरात्र झटत आहेत. राणे यांच्या सिंधुदुर्गमधील लाईफ टाईम' मेडिकल हॉस्पिटलचे उद्घाटन करण्यासाठी केंद्रीय गृहमंत्री अमित शहा हे दिल्लीहून पडवे येथे मुद्दाम आले होते. राणे यांचे सामाजिक, शैक्षणिक कार्य, त्यांचा संघर्षमय राजकीय प्रवास आणि विकासाची कामे पाहून अमित शहा यांनी राणे यांचे मुक्तकंठाने कौतुक केले. राणे यांच्यावर लवकरच मोठी जबाबदारी देण्यात येईल, असे सुचक उद्गारही शहा यांनी काढले होते.

तेव्हाच राणे यांना केंद्रीत मंत्रीपद मिळणार याची चर्चा सुरू झाली. गेले काही दिवस नारायण राणे लवकरच केंद्रीय मंत्रिमंडळात, असे भाकीत सोशल मीडियावरून सर्वत्र फिरत होते. गेले दोन-तीन आठवडे जिथे राणेसाहेब जातील तिथे त्यांचे अभिनंदन करण्यासाठी लोक भेटत होते. पण राणेसाहेबांनी अत्यंत संयमाने सर्वाना उत्तरे दिली. मला निश्चित काही समजले तर मी आपणास लगेच सांगेन, असे ते सांगत असत. शाखाप्रमुख, नगरसेवक, आमदार, विरोधी पक्षनेते, मंत्री, मुख्यमंत्री आणि नंतर भाजपमध्ये आल्यावर राज्यसभा खासदार अशा सर्व जबाबदाऱ्या त्यांनी समर्थपणे हाताळल्या. कोणत्याही उच्चपदावर असताना त्यांना कधी अहंकाराने स्पर्श केला नाही. सर्वसामान्य लोक आणि कार्यकर्ते यांच्यापासून ते कधी दूर गेले नाहीत. किंबहुना लोकांची गर्दी हेच त्यांचे टॉनिक आहे. पाच दशकांहून अधिक काळ ते सार्वजनिक जीवनात आहेत. नगरसेवक ते मुख्यमंत्री या त्यांच्या वाटचालीचा एक पत्रकार म्हणून मी साक्षीदार आहे. त्यांचा राजकीय प्रवास म्हणजे फार मोठा झंझावात आहे. सदैव संघर्ष हा तर त्यांच्या जीवनाचा मंत्र आहे.

(क्रमशः)

# शिवसेना ही महाराष्ट्र अखंड ठेवणारा विचार

## जिल्हाप्रमुख अप्पासाहेब जाधव यांचे प्रतिपादन

प्रतिनिधी



माजलगाव : तोडा, फोडा आणि राज्य करा हा इंग्रजांचा विचार घेऊन महाराष्ट्र वेगवेगळ्या भागांत विभागण्याचा विचार काही नतद्रष्ट प्रवृत्ती करतात. परंतु, महाराष्ट्र हा एक असून, कारवार, निपाणी व बेळगाव हे महाराष्ट्राचे भाग आहेत. हा अखंड महाराष्ट्र ठेवणारा विचार म्हणजे शिवसेना असल्याचे प्रतिपादन शिवसेना जिल्हाप्रमुख आप्पासाहेब जाधव यांनी केले.

शिवसंपर्क अभियानअंतर्गत माजलगाव तालुक्यातील राजेवाडी येथे शनिवारी आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते. या बैठकीस संजय महाद्वार, अमोल डाके, दासू बादाडे, सुखदेव धुमाळ, करण थोरात, जयराम राऊत, कोंडीबा काळे, राम कुलकर्णी, महेश थेटे, पांडुरंग गोझे, नवनाथ शेळके, साहेबराव आव्हाड, परमेश्वर गायकवाड, ईश्वर थेटे, सचिन साळुके, दीपक महागोविंद, रविराज महागोविंद, पंडित थेटे, अशोक थेटे, परमेश्वर नांदगावकर, अतुल चव्हाण, संजय शिंदे, लक्ष्मण सोळंके, अखिल भाई, हरणे विलास, अमोल शिनगारे यांच्यासह शिवसैनिक व ग्रामस्थांची उपस्थिती होती.



# श्री मंगलनाथ मल्टीस्टेटला राज्यस्तरीय दीपस्तंभ पुरस्कार

प्रतिनिधी

माजलगाव : येथील मंगलनाथ मल्टिस्टेट को-ऑप क्रेडिट सोसायटी लि.माजलगावला महाराष्ट्र राज्य सहकारी पतसंस्था फेडरेशनचा दिपस्तंभ पुरस्कार मिळाला असून या पुरस्काराचे वितरण दि.२४ रोजी शिर्डी येथे मान्यवरांच्या हस्ते वितरण करण्यात आले आहे.

महाराष्ट्रातील पतसंस्था चळवळीसाठी दिपस्तंभाप्रमाणे कार्य करून पतसंस्था चळवळीला चांगली दिशा देऊन दिशादर्शक बनण्याचे कार्य केल्याबद्दल महाराष्ट्र राज्य 'राज्यस्तरीय दीपस्तंभ पुरस्कार २०२०' श्री मंगलनाथ मल्टीस्टेटला दि.२४ जुलै रोजी सहकार संशोधन व प्रशिक्षण मंदिर, शिर्डी येथे मान्यवरांच्या हस्ते राज्यातील सर्व मल्टिस्टेट पतसंस्थांच्या प्रतिनिधींच्या उपस्थितीत या पुरस्काराचे वितरण करण्यात आले. याप्रसंगी संस्थेचे मुख्य कार्यकारी अधिकारी रविंद्र कानडे, नारायण शेंडगे, सत्यविजय कुलकर्णी, सचिन कैलासे, प्रविण हालकुडे, रूपेश पांचाळ यांची उपस्थिती होती. हा पुरस्कार मिळाल्याबद्दल संस्थेचे अध्यक्ष आर.जी.कानडे यांचे सर्व स्तरातून अभिनंदन होत आहे.



## राजेगावात गुणवंतांचा गौरव

माजलगाव : तालुक्यातील राजेगाव येथील सरस्वती माध्यमिक विद्यालयात गुणवंत विद्यार्थ्यांचा नुकताच गौरव करण्यात आला. यावेळी माजी सरपंच केसरबाई साळवे, मधुकर साळवे, पोलीस कर्मचारी ललितकुमार साळवे, शाहू आवचार, युवराज सावंत आदींची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी गुणवंत विद्यार्थी काजल नामदेव साळवे, रोहन दीपक साळवे, राज राहुल गायकवाड, प्रताप ईश्वर साळवे यांचा गौरव करण्यात आला.

# आरोग्य पथकाकडून किटकशास्त्रीय सर्वेक्षण

प्रतिनिधी



माजलगाव : डेंग्यू आणि साथजन्य आजाराच्या पार्श्वभूमीवर माजलगाव शहरातील विविध भागात आरोग्य पथकाकडून किटकशास्त्रीय सर्वेक्षण करण्यात आले. यावेळी संशयित रूग्णांचे रक्त नमुनेही आरोग्य पथकाकडून संकलित करण्यात आले.

जिल्हा हिवताप विभाग आणि तालुका आरोग्य अधिकारी डॉ.मधुकर घुबडे यांच्या मार्गदर्शनाखाली आरोग्य कर्मचारी तौफिक पठाण यांच्यासह आरोग्य पथकाकडून शहरात मंगळवार, २० जुलै रोजी हिवताप जनजागृती आणि सर्वेक्षण मोहिम राबविण्यात आली. यामध्ये संशयित रूग्णांच्या रक्त नमुन्यांची तपासणी करण्यात आली. तसेच साथरोग प्रतिबंधात्मक औषधांचेही वितरण करण्यात आले. डेंग्यू आणि साथरोग नियंत्रणात आणण्यासाठी पालिका प्रशासनाकडून उपाययोजना केली जात आहे. शहरातील स्वामी विवेकानंद नगर, अशोक नगर, भिमनगर, इंदिरानगर, शाहूनगर या परिसरात किटकशास्त्रीय सर्वेक्षण करण्यात आले.

# रोटरी क्लबतर्फे तुळजाभवानी मंदिर परिसरात वृक्षारोपण

प्रतिनिधी



माजलगाव : येथील रोटरी क्लबच्या वतीने शहर परिसर व वॉटर कप स्पर्धेतील गावांत झाडांचे रोपण करण्यात येत आहे. याच अनुषंगाने शहरातील बसस्थानक तसेच तुळजाभवानी मंदिर परिसरात रविवारी झाडांचे रोपण करण्यात आले. यावेळी वड, पिंपळ, सिसम, जांभूळ, सप्तपर्णी या ५१ झाडांचे रोपण करून या झाडांना लोखंडी टीगार्ड बसविण्यात आले. या बरोबरच झाडांसाठी ठिबक सिंचनाची सोय गणपत वायबसे यांनी उपलब्ध करून दिली.

यावेळी रोटरीचे अध्यक्ष गजेंद्र खोत, सचिव रणजित राठोड, इम्रान नाईक, तुळजाभवानी मल्टिस्टेटचे अध्यक्ष चंद्रकांत शेजूळ, डॉ.सुनिल गरड, प्रा.निळकंठ साबळे, प्रभाकर शेटे, अंकुश राठोड, विनोद जाधव, जिव्हाळा प्रतिष्ठानचे डॉ.अजयसिंह डाके, हनुमान कासट, डॉ.यशवंत राजेभोसले, अण्णासाहेब तौर, ओमप्रकाश वायबसे, पांडुरंग चांडक, अली पटेल, प्रताप धपाटे, परमेश्वर शिंदे, लक्ष्मण गव्हाणे, निलेश काटकर, शरद राठोड, वहिद देशमुख, जय कोळसे यांची उपस्थिती होती.

## श्रीमती लक्ष्मीबाई कुलकर्णी यांचे निधन

प्रतिनिधी



माजलगाव : शहरातील मंगलनाथ कॉलनी भागातील रहिवाशी असलेल्या श्रीमती लक्ष्मीबाई नारायणराव कुलकर्णी वय ९२ वर्षे यांचे वृध्दापकाळाने सोमवारी दि.२६ जुलैला पहाटे निधन झाले.

त्यांच्या पार्थिवावर मंगलनाथ स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले. लक्ष्मीबाई कुलकर्णी या धार्मिक वृत्तीच्या होत्या. शांत व मनमिळावू स्वभावामुळे त्या परिसरात सुपरिचीत होत्या. त्यांच्या पश्चात चार मुले, पाचमुली, सुना, नातवंडे, पतवंडे असा परिवार आहे. येथील सातत्य कोचिंग क्लासेसचे संचालक बी.एन. कुलकर्णी यांच्या त्या मातोश्री होत.

# संस्थान मठ येथे गुरूपौर्णिमा उत्साहात

## प्रभू पंडीताराध्य शिवाचार्य महाराजांनी दिले शुभआशीर्वाद

प्रतिनिधी

माजलगाव : शहरात शुक्रवारी सर्वत्र गुरूपौर्णिमेचे वातावरण पाहण्यास मिळाले. शहरातील अनेक मंदिरामध्ये गुरूपौर्णिमेनिमित्त भजन, कीर्तन आणि प्रवचनासह विविध सांस्कृतिक व धार्मिक कार्यक्रमांचे शुक्रवारी आयोजन करण्यात आले होते. तसेच सदगुरू श्री मिस्कीन स्वामी मठांमध्ये गुरूपौर्णिमा मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. श्री संस्थान मठ येथे शिष्यगण, भाविकांनी श्री गुरू तपोरत्नं प्रभू पंडिताराध्य शिवाचार्य महाराज यांची भेट घेवून शुभआशीर्वाद घेतले.



माजलगाव येथील सदगुरू श्री मिस्कीन स्वामी संस्थान मठात गुरूपौर्णिमेनिमित्त शिष्य व भक्तगणांकडून श्रीगुरूंच्या पूजन सोहळ्याचे आयोजन शुक्रवारी करण्यात आले होते. यावेळी विविध धार्मिक आणि सामजिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले. या सोहळ्यासाठी महाराष्ट्र राज्यासह कर्नाटक, आंध्रप्रदेश तथा सीमावर्ती भागातून शिष्यगण उपस्थित होते.

या सोहळ्यात समाज बांधवांच्या वतीने श्री मिस्किनस्वामी संस्थान मठाचे मठाधिपती श्री गुरू तपोरत्नं प्रभू पंडिताराध्य शिवाचार्य महाराज, नूतन उत्तराधिकारी श्री चंद्रशेखर शिवाचार्य महाराज माजलगावकर यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी श्री गुरूंचा अमृतोपदेश, महाप्रसादाचेही आयोजन करण्यात आले होते.

या सोहळ्याला औरंगाबाद, नांदेड, जालना, परभणी, उस्मानाबाद, लातूर, सोलापूर तसेच संबंध मराठवाड्यातील शिष्यगण, भाविकांची उपस्थिती होती. याप्रसंगी उद्योजक सोमनाथआप्पा साखरे (औरंगाबाद), नगराध्यक्ष सोमनाथआप्पा हालगे (परळी वैजनाथ),

समाजसेवक दत्ताआप्पा इटके (परळी वैजनाथ), विजयकुमार मुसळे (बीड), श्री मंगलनाथ मल्टीस्टेटचे सीईओ रविंद्र कानडे, विलासआप्पा शेटे, वर्तमान माध्यम समूहाचे संपादक भगीरथ तोडकरी यांच्यासह माजलगावातील वीरशैव लिंगायत समाज बांधवांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

# सोळंके महाविद्यालयाचे सुवर्ण महोत्सवी वर्ष


## विविध कार्यक्रमांची रेलचेल; आमदार प्रकाश सोळंके यांची माहिती



प्रतिनिधी

माजलगाव : मराठवाडा शिक्षण प्रसारक मंडळाच्या येथील लोकनेते सुंदरराव सोळंके महाविद्यालयाचे २०२१-२२ हे सुवर्ण महोत्सवी वर्ष असून त्यानिमित्त विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले असल्याची माहिती आमदार प्रकाश सोळंके यांनी दिली. सोळंके महाविद्यालयात शनिवारी आयोजित पत्रकार परिषदेत बोलत होते.

आमदार सोळंके म्हणाले की, ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना उच्च व दर्जेदार शिक्षण देण्यासाठी राज्याचे तत्कालीन उपमुख्यमंत्री दिवंगत लोकनेते सुंदरराव सोळंके यांनी १९७१ मध्ये महाविद्यालयाची स्थापना केली होती. २०२१- २२ हे वर्षे महाविद्यालय सुवर्ण महोत्सवी वर्ष साजरे करीत आहे. त्यानिमित्त महाविद्यालयात वर्षभर विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. ज्यामध्ये ऑगस्ट महिन्यापासून महाविद्यालयात कोविड लसीकरणाने या सुवर्ण महोत्सवी वर्षाचे उद्घाटन करण्यात येणार आहे. व्यापाऱ्यांसाठी मार्गदर्शन शिबिर, रक्तदान, स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन, सुंदरराव सोळंके यांच्या जयंतीनिमित्त सप्टेंबर महिन्यात व्याख्यानमाला, शेअर मार्केट बाबत मार्गदर्शन, विज्ञान प्रदर्शन, वादविवाद स्पर्धा, वक्तृत्व स्पर्धा, आरोग्य शिबिर, महिला आरोग्य तपासणी, शेतकऱ्यांना आधुनिक शेती तंत्रज्ञानाची माहिती देण्यासाठी कृषी शिबिर, दर्पण दिनानिमित्त ज्येष्ठ पत्रकारांचे मार्गदर्शन, विद्यापीठस्तरीय स्थानिक पातळीवरील हॉलीबॉल, बॅडमिंटन, टेबल टेनिस आदी खेळांच्या स्पर्धांचे आयोजन, विजेत्या खेळाडूंचा सत्कार, माजी विद्यार्थी, माजी कर्मचारी, पालक मेळावा, राष्ट्रीय प्रश्नमंजूषा, शिवजयंतीनिमित्त व्याख्यान, विद्यार्थ्यांसाठी स्वंयशासन दिन, गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार, प्राविण्य मिळविलेल्या विद्यार्थ्यांचा सत्कार, जागतिक महिला दिनी महिलांसाठी व्याख्यान, डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंतीनिमित्त व्याख्यान, ग्रंथप्रदर्शन तसेच विविध विषयांवर चर्चासत्रांचे आयोजन करण्यात येणार आहे. याप्रकारे वर्षभर विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले असून यामध्ये आजी, माजी विद्यार्थ्यांनी सहभागी व्हावे असे आवाहनही आमदार प्रकाश सोळंके यांनी केले. पत्रकार परिषदेला स्थानिक नियामक मंडळाचे अध्यक्ष अ‍ॅड.भानुदास डक, प्राचार्य जी.के.सानप, प्रा.निळकंठ साबळे, प्रा.भाऊसाहेब राठोड, सुरेंद्र रेदासणी उपस्थित होते.

**'गोपीनाथ मुंडे हे नाव जगाला विसरू देणार नाही' अशी शपथ घेऊन राजकारणात दमदार वाटचाल करत समाजातील वंचित, पिडित घटकाला न्याय देण्यासाठी प्रामाणिक धडपड करणारे स्वाभिमानी नेतृत्व म्हणून पंकजाताई मुंडे यांच्याकडे आज पाहिले जाते. लोकनेते गोपीनाथराव मुंडे यांचा सक्षम राजकीय वारसा समर्थपणे पुढे घेऊन जात असताना राजकारणा सोबतच समाजकारणातही कायम आघाडीवर असलेले हे व्यक्तिमत्व.. समाजातील वंचित, पिडित घटकांच्या सेवेसाठी ज्यांनी आपले आयुष्य वेचले, त्या मुंडे साहेबांचे अधुरे स्वप्न पूर्ण करण्याचा ध्यास घेत, येणाऱ्या प्रत्येक संकटावर मात करत अविरतपणे वाटचाल करणारे हे धुरंधर नेतृत्व...**



# समर्थ वारसा, सक्षम नेतृत्व

निमित्त

**प्रदीप कुलकर्णी**

पंकजाताई मुंडे यांची राजकीय कारकिर्द सुरवातीपासून ते आतापर्यंत तशी संघर्षाचीच.. तरीही मिळालेल्या प्रत्येक संधीचा उपयोग त्यांनी लोकांच्या भल्यासाठीच केला. एक सरळमार्गी राजकारणी अशी त्यांची प्रतिमा आहे. जनतेच्या अडी अडचणीला धाऊन जाणारे, त्यांच्या वेदना समजून घेणारे व्यक्तिमत्व म्हणूनही त्यांचेकडे पाहिले जाते. मंत्री म्हणून काम करताना जलसंधारण, ग्रामविकास,महिला व बालविकास, रोजगार हमी योजना अशी चार चार खाते यशस्वीपणे सांभाळून त्या खात्यांना त्यांनी जागतिक पातळीवर नावलौकिक मिळवून दिला, एवढेच काय, या खात्यांना आपल्या जनाभिमुख निर्णयांनी आणि स्वकर्तृत्वाने राष्ट्रीय पुरस्कार प्राप्त करून दिले. या खात्याच्या माध्यमातून विविध योजनांचा लाभ तर त्यांनी गोरगरिबांपर्यंत पोहोचविलाच परंतु त्याचबरोबर अनेक नव नवीन योजना अंमलात आणून लोक कल्याणाची एक अनोखी संकल्पना रूजविली.

सत्तेच्या माध्यमातून विविध लोकोपयोगी उपक्रम राबवल्याने त्यांना अफाट लोकप्रियता मिळाली, ज्यामुळे अनेकांची पोटं दुखली. कट कारस्थानांच्या राजकारणातुन त्यांची प्रतिमा हनन करण्याचा डाव पारंपारिक विरोधकांकडून रचला गेला.परंतु प्रत्येक 'विजयात संघर्ष' आणि प्रत्येक 'संघर्षात विजय' या लोकनेत्याच्या समीकरणाची शिकवण व संस्काराच्या शिदोरीवर त्यांनी इथेही विजय मिळवला. वंचित, शोषित, बहुजनांच्या हितासाठी मुंडे साहेबांचा वसा घेऊन सुरु झालेला त्यांचा राजकीय प्रवास रोखण्याचा अनेक राजकीय महारथींनी निष्फळ प्रयत्न केला व आजही सुरू आहे, परंतु संघर्षाची शिकवण व जनसामान्यांचे असीम पाठबळ लाभल्याने त्यांना रोखणे कुणालाही शक्य झाले नाही व पुढेही होणार नाही.

तसे, पाहिले तर 'संघर्षकन्या ते विकासकन्या' या प्रवासात पंकजाताईंच्या राजकारणाचा आलेख हा नेहमीच चढता राहिला आहे. पहिल्यांदा आमदार आणि त्यानंतर दुस-यांदा पुन्हा आमदार आणि कॅबिनेट मंत्री म्हणून त्यांनी अतिशय यशस्वीपणे काम केले. भाजपच्या राष्ट्रीय सचिव आणि मध्यप्रदेशच्या सह प्रभारी म्हणून आज पक्ष नेतृत्वाने त्यांचेवर जबाबदारी सोपवली आहे. मागील महिन्यात त्यांच्या नेतृत्वाखाली ओबीसींच्या प्रश्नांवर राज्यभरात रास्ता रोको आंदोलन झाले. ओबीसींच्या राजकीय आरक्षणाशिवाय निवडणूका होऊ देणार नाही अशी ठाम भूमिका त्यांनी घेतली. या भूमिकेमुळे राज्य सरकार आणि निवडणूक आयोगाने जाहीर केलेल्या पाच जिल्हा परिषदा व काही पंचायत समित्यांच्या पोटनिवडणुका स्थगित केल्या, ही त्यांच्या नेतृत्वाची चुणूकच म्हणावी लागेल.

मोठ्या माणसांचा वारसा चालवणे हे तसे एक आव्हानच असते, ते पेलणे सर्वानाच शक्य होत असे नाही पण पंकजाताई मात्र याला अपवाद आहेत. मुंडे साहेबांचा वारसा होणे म्हणजे त्यांच्या सत्ता, संपतीचा वारसा होणे नाही, तर त्यांच्या आदर्श विचारांचा..वंचित, पिडित, शोषित, दीनदुबळ्यांची सेवा करण्याचा.. आणि त्यांना विकासाच्या मुख्य प्रवाहात आणण्याचा वारसा चालवणे..जे काम पंकजाताई आपल्या राजकीय जीवनात सातत्याने करत आल्या आणि पुढेही अव्याहतपणे करतील. सामाजिक बांधिलकी जोपासताना 'उतणार नाही, मातणार नाही, घेतला वसा टाकणार नाही ' हे त्यांनी केवळ बोलून नव्हे तर आपल्या कृतीतून दाखवून दिले आहे. गोपीनाथ मुंडे प्रतिष्ठान असे एक व्यासपीठ आहे की त्या माध्यमातून त्यांनी आपल्या समाज कार्याला वाहून घेतले आहे. आपल्या कार्यकाळात त्यांनी केवळ रस्ते, इमारतीच बांधल्या नाहीत तर माणसे जोडण्याचे देखील काम केले. महा आरोग्य शिबीर, दिव्यांगांना साहित्य वाटप, आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांच्या कुटूंबियांना मदत, बेरोजगारांना नोकऱ्या, गरजू रूग्णांची आरोग्य तपासणी व महागड्या शस्त्रक्रिया मोफत उपलब्ध करून दिल्या. लोकनेत्याचा हा वारसा आपणच आहोत असे सांगणाऱ्यांना मात्र ही गोष्ट या जन्मात शक्य होणार नाही. हे स्वाभिमानी नेतृत्व संघर्षाच्या अग्नितून बाहेर पडून पुन्हा तितक्याच रूबाबात आत्मविश्वासाने वाटचाल करेल, यात तीळमात्र शंका नाही...आजच्या वाढदिवसानिमित्त त्यांना कोटी कोटी शुभेच्छा..!

(लेखक पंकजा मुंडे यांचे स्विय सहाय्यक आहेत.)







आधुनिक विचारांचे वर्तमान
हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक आणि **संपादक : भगीरथ गौरीशंकर तोडकरी,** यांनी तुळजा भवानी पब्लिकेशन ,माजलगाव ता.माजलगाव जि. बीड 431131 (महाराष्ट्र) येथे छापून आधुनिक विचारांचे वर्तमान कार्यालय, 23,मुख्य रस्ता, मस्जिद चौक, माजलगाव ता.माजलगाव जि.बीड येथे प्रसिद्ध केले. ईमेल : vartmaneditor@gmail.com भ्रमणध्वनी : **9423209823** RNI : MAHMAR/2018/76928, अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या, लेख, व्यक्त झालेल्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (सर्व वाद माजलगाव न्यायालय अंतर्गत) Postal REG No : L/92/RNP/Beed/2020-2022.